महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ४० वे | दिनांक : ०१/०२/२०२६ | वार : रविवार

## सुनेत्रा पवार महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री, मात्र राष्ट्रवादीला "अर्थ" नाहीच



**मुंबई :** अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री झाल्या आहेत. शनिवारी दुपारी २ वाजता त्यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाच्या नेत्या म्हणून निवड झाली. सायंकाळी ५ वाजता त्या राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून त्यांनी शपथ घेतली.

सुनेत्रा पवार यांची पक्षनेते म्हणून निवड करण्यासाठी विधानभवनात राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्ष आणि विधानपरिषद सदस्यांची बैठक बोलावण्यात आली होती. तिथे दिलीप वळसे पाटील यांनी त्यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला.

उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्यापूर्वी सुनेत्रा यांनी राज्यसभेतील खासदारपदाचा राजीनामा दिला. २८ जानेवारी रोजी बारामती येथे झालेल्या विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाल्यानंतर उपमुख्यमंत्रीपद रिक्त झाले होते.

## राजकारणात खुर्ची माणसापेक्षा महत्त्वाची : संजय शिरसाट



**छत्रपती संभाजीनगर :** राजकारणात गेल्या दोन दिवसांमध्ये ज्या घडामोडी पाहिल्या यामुळे असे वाटते की माणसापेक्षा खुर्चीला जास्त महत्त्व आहे. राजकारणामध्ये खुर्ची जिंकलेली आहे, सार्वजनिक जीवनातही खुर्चीच जिंकली आणि माणूस हरल्याचे चित्र दिसून येत आहे. सर्व सामान्य माणसांना या गोष्टी भावत नाहीत, शासकीय दुखवटा संपण्यापूर्वी हे सर्व निर्णय व्हायला नको होत असे मला वाटते, असे शिवसेनेचे मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.

संजय शिरसाट म्हणाले की, शरद पवारांनी जे सूचक वक्तव्य केले आहे त्याकडे जर पाहिले तर राजकारणातील घडामोडीमध्ये शरद पवारांना विचारले गेले नसावे. पक्षातील नेत्यांनी आणि राजकीय सल्लागारांनी घेतलेला हा निर्णय शरद पवारांना याबद्दल कितपत माहिती आहे हे सांगणे शक्य नाही. देवेंद्र फडणवीस यांनी जी उपमुख्यमंत्रीपदाबाबत जी भूमिका घेतलेली आहे तीच भूमिका आमची आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदारांनी निर्णय घ्यायचा आहे. त्यांनी घेतलेल्या निर्णयाना पाठिंबा देणं हे आम्हाला गरजेचे आहे. त्यांनी घेतलेल्या निर्णयाला आम्ही विरोध करणार नाही.

संजय शिरसाट म्हणाले की, अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा होते त्यांच्या शब्दाच्या आणि निर्णयाविरोधात जाण्याची कोणत्याही नेत्याची ताकद नव्हती. त्यांची शरद पवार किंवा इतर नेत्यांशी जी बैठक झाली आहे असे जे म्हणतात त्यात जो निर्णय झाला असता तो सर्वांनी मान्य केला असता. पण आता मला वाटते परिस्थिती आता बदललेली आहे. आता सामूहिक निर्णयाचे एक सामूहिक वारे राजकारणामध्ये सुरू झाले आहे म्हणून शरद पवारांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्रीकरणाच्या चर्चेमध्ये खंड पडेल अशी शंका व्यक्त केली आहे.

संजय शिरसाट म्हणाले की, दोन्ही राष्ट्रवादीचे एकत्रीकरण ही त्यांची पहिला भूमिका होती. यावर त्यांच्या पक्षाची चर्चा झाली, ते एकत्र आले असते तर ते केंद्रात एनडीए आणि राज्यात ते महायुतीमध्ये आले असते आणि त्याच पद्धतीचे राजकारण पुढे चालले असते. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जे नेते आहेत ते सुनेत्रा पवारांनाच पुढे करतील.

## पाटील चालेल पण पटेल नको : राज ठाकरे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष्याच्या अध्यक्षपदावर टोला



**मुंबई :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर आज सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेत राज्याच्या राजकारणात नवा अध्याय सुरू केला. त्या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. शपथविधीच्या वेळी वातावरण भावनिक होते. कार्यकर्त्यांकडून अजित पवार अमर रहे, अशा घोषणा देण्यात आल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक वरिष्ठ नेते या सोहळ्यास उपस्थित होते. या शपथविधीनंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्षपद कोणाकडे जाणार, याबाबत राजकीय चर्चांना वेग आला आहे.

याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट करत प्रतिक्रिया दिली. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेससारख्या मराठमोळ्या आणि रांगड्या पक्षाचा अध्यक्ष मराठीच असावा, असे मत व्यक्त केले. पाटील चालेल पण पटेल नको, असे म्हणत त्यांनी नाव न घेता खासदार प्रफुल्ल पटेल यांच्यावर निशाणा साधल्याचे स्पष्ट दिसून आले. राज ठाकरे यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात नवी चर्चा सुरू झाली आहे.

राज ठाकरे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, गेल्या काही काळात महाराष्ट्राच्या राजकारणाचा 'विचका' झाला आहे. अशा परिस्थितीत भाष्य करावेसे वाटत नसले तरी आजच्या घडामोडींवर बोलणे भाग आहे. राष्ट्रवादी काँग्रेस हा मराठमोळ्या मातीतून उभा राहिलेला पक्ष असल्याने त्याचे नेतृत्वही मराठी व्यक्तीकडेच असावे, असे त्यांनी ठामपणे मांडले. या वक्तव्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या अंतर्गत चर्चांनाही वेगळा आयाम मिळाला आहे.

दरम्यान, शपथविधीपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाची बैठक झाली. या बैठकीत सुनेत्रा पवार यांच्या नावाचा गटनेतेपदासाठी प्रस्ताव दिलीप वळसे पाटील यांनी मांडला. या प्रस्तावाला मंत्री छगन भुजबळ यांनी अनुमोदन दिले. परिणामी, सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ गटनेतेपदी एकमताने निवड झाली. त्यानंतर त्यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यामुळे अजित पवारांनंतर पक्षाची धुरा सुनेत्रा पवार यांच्या खांद्यावर येणार असल्याचे स्पष्ट झाले.

पक्षाच्या भविष्यातील नेतृत्वाबाबतही हालचाली सुरू झाल्याची माहिती मिळत आहे. उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर सुनेत्रा पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी पुढे करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले जात आहे. त्यासाठी सह्या घेण्याची मोहीमही सुरू असल्याची चर्चा आहे. त्यामुळे पक्षात मोठ्या बदलांचे संकेत मिळत आहेत. शपथविधी सोहळ्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ, धनंजय मुंडे यांच्यासह अनेक प्रमुख नेते उपस्थित होते. या सोहळ्यादरम्यान कार्यकर्त्यांनी दिलेल्या घोषणांमधून अजित पवारांविषयी असलेली भावना स्पष्ट दिसून आली. शोक आणि राजकीय घडामोडी यांचे मिश्र चित्र लोकभवनात पाहायला मिळाले.

एकूणच, सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्वाबाबत सुरू झालेल्या चर्चांना राज ठाकरे यांच्या वक्तव्यामुळे वेगळे वळण मिळाले आहे. मराठी नेतृत्वाचा मुद्दा पुढे आल्याने पक्षातील समीकरणांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा निर्णय कोणाकडे जातो आणि पुढील राजकीय घडामोडी कशा घडतात, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा गेल्या काही काळात पार विचका झाला आहे त्यावर खरंतर भाष्य पण करावं असं वाटत नाही. पण तरीही आज दिवसभर ज्या घडामोडी सुरु आहेत त्यावर बोलावंच लागेल. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासारख्या अस्सल मराठमोळ्या मातीतला, आणि रांगड्या पक्षाचा अध्यक्ष हा कोणीही मराठी असावा, पाटील असावा पण पटेल नाही !

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०१ फेब्रुवारी २०२६


## मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात








**छत्रपता सभाजानगर :** मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळावा आपल्या सांस्कृतिक परंपरेची जोपासना व वृद्धिंगत होण्यासाठी शाळेमध्ये माननीय श्री जी श्रीकांत साहेब यांच्या स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल अंतर्गत शाळेमध्ये मुख्याध्यापक श्री पी पी शिंदे सर यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत उत्साह पूर्ण व आनंदी वातावरणात यशस्वीरित्या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात केंद्रीय मुख्याध्यापक श्री के बी चौधरीसर आणि शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्या श्रीमती अश्विनी डांगे आणि सबिया शेख असे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. मुख्याध्यापकांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीम.राऊत मॅडम यांनी केले. गणेश स्तुतीने कार्यक्रम सुरू करण्यात आला. विद्यार्थ्यांनी यामध्य दशभक्तापर गात,गाधळ, विनोदी गाणे, रिमिक्स बडबड गीते,जोगवा अशा अनेक गाण्यांमधून नृत्य अभिनय नाट्यछटाद्वारे अशा विविध कलाकृतींनी उपस्थितीतांची मने जिंकली. वहावा मिळवली. संपूर्ण पालक वर्ग व शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक वाघ सर,राठोड सर, पठाण सर, चव्हाण सर, सूर्यवंशी सर,तारो मॅडम भारद्वाज मॅडम, भिंगोले मॅडम, शिंदे मॅडम, फुलंब्रीकर मॅडम, रेवनवार मॅडम बालवाडी शिक्षिका कानडे मॅडम, कवठेकर मॅडम सेविका सुनीता साबळे यांनी परिश्रम व मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी केंद्रीय मुख्याध्यापकांनी मनोगत व्यक्त केले. शिंदे मॅडम यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

## कळंकी गाव बनतय गावरान लसुण पिकाचे उत्पादन केंद्र




**कन्नड (अरुण थोरात) :** अनुकूल भौगोलिक वातावरण व कुठल्या शासकीय मदत, मार्गदर्शना शिवाय कन्नड तालुक्यातील कळंकी हे गाव गावरान गुलाबी लसुण पीकाचे उत्पादन केंद्र बनले आहे. दुर्गम डोंगराग्रस्त भागात वसलेल्या कळंकी गावात दरवर्षी गावरान लसुण पिकाची मोठ्या प्रमाणात लागवड केल्या जाते. चोहीबाजुने घनदाट जंगलांनी वेढलेल्या या गाव शिवारातील बहुतांश शेत जमीन हलक्या व मुरमाड प्रतीची आहे. ऐंशी पक्के शेतकरी अल्प ते अत्यल्प भुधारक आहेत. ऐंशी, नव्वद च्या दशका पर्यंत येथे पाच ते सहा गुऱ्हाळे होती. येथील गुळाला दूरपर्यंत मागणी होती. दहा पंधरा वर्षां पूर्वी मोठ्या प्रमाणात द्रांक्ष बागा होत्या. मात्र उत्पादन खर्च परवडत नसल्याने द्रांक्ष शेती येथून गायब झाली. त्याला पर्याय म्हणून डाळींबाची मोठ्या प्रमाणात लागवड झाली. उत्पादन चांगले मिळकत परंतू किड रोगांचा प्रादुर्भाव व अपेक्षीत बाजार भाव न मिळाल्याने द्रांक्ष बागा ही गायब झाल्यात. दरम्यान च्या काळात येथे आद्रक पीकाने मोठी समृद्धी आणली, परंतू रोग किडी मुळे आद्रक क्षेत्र कमी होत गेले.गेल्या पाच सहा वर्षात येथील शेतकरी गावरान लसुण या पीकाकडे वळाला आहे. पोषक नैसर्गिक थंड हवामान, खनिजयुक्त जमीन, लसणाला लाल रंग येण्यासाठी जमीनीतील विशिष्ट गुणधर्म, आधुनिक सिंचन व्यवस्था, पीक व्यवस्थापन अनुभव, उपलब्ध जवळील बाजारपेठ, वर्षभर साठवण अनुकूलता, आर्थिक अडचणी च्या काळात सहज मिळणारा पैसा, आदी कारणांमुळे येथील प्रत्येक शेतकरी किमान एक ते दोन एकर लसुण पिकाची लागवड करतो. येथे पाठविल्या जाणाऱ्या लसणाला बाजारात विशेष मागणी असल्याने अलीकड च्या काळात घरगुती वापर व व्यापारी बांधा पर्यंत येऊ लागले आहेत. त्यामुळे इतर पिकां बरोबरच रब्बी हंगामात लसुण पिकाचे लागवड क्षेत्रात दरवर्षी वाढ होत आहे. शिवारातील सुमारे ऐंशी पक्के शेतकरी हे अल्पभूधारक असल्याने कमी क्षेत्रात अधिकाधिक उत्पन्न घेण्याचा येथील शेतकऱ्यांचा हातखंडा असल्याने त्यासाठी लसुण हे पीक हक्काचे उत्पन्न साधन बनले आहे.चौकट_स्थानिक व देशी वाण असलेले या व्हरायटीच्या जि.आय. टॅगिंग, (जागतिक मानंकन )साठी गावाने प्रयत्न केल्यास या लसणास आंतरराष्ट्रीय ओळख तर मिळेलचं, शिवाय शेतकऱ्यांना हा " कळंकी गार्लिक ब्रँड" म्हणून अधिक नफा व भाव ही देईल. जसे कि वाहेगाव ची हळद, जळगाव चीं भरीत वांगी, मात्रे वाडी चीं दगडी ज्वारी ई. - डॉ. संतोष पाटील. जैवविविधता संवर्धक







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०१ फेब्रुवारी २०२६

## जवाहर महाविद्यालय अणदूर येथे डॉ. सहदेव बिराजदार यांचा सेवापुर्ती सोहळा



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** जवाहर महाविद्यालयातील वाणिज्य विभाग प्रमुख डॉ सहदेव गणपती बिराजदार हे दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत यानिमित्त त्यांचा सेवापुर्ती सोहळा संपन्न झाला त्यांनी जवाहर महाविद्यालयात वाणिज्य विभागात ३३ वर्षे पाच महिने प्राध्यापक म्हणून सेवा पूर्ण केले असून संपूर्ण सेवा कालावधीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाबरोबरच त्यांची विद्यापीठातील सर्व कामे महाविद्यालयातील कामे करून देत होते महाविद्यालयाच्या सर्व कार्यक्रमात परीक्षा कालावधीत जे कार्य मिळेल ते मनापासून पूर्ण करीत असत त्यांच्या संपूर्ण सेवा कालावधीत त्यांनी एकही मेडिकल रजा घेतली नसून एकदाही मेडिकल बिल उचललेले नाही महाविद्यालयाच्या प्रत्येक नेकच्या वेळी सहावा क्रॅटेरिया त्यांनी पूर्ण केला आहे. या कार्यक्रमाला सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्रीमंत मुळे गुरुजी, सेवानिवृत्त शिक्षक चंद्रकांत अलुरे,शेटे गुरुजी, जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे गोपाळ कुलकर्णी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ.अंकुश कदम उपप्राचार्य मल्लिनाथ लंगडे सर, प्राचार्य डॉ. चनशेट्टी सर तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व नातेवाईक उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एम बी बिराजदार तर आभार डॉ.आर एस नळगे सर यांनी केले

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्ताने विविध उपक्रमाचे आयोजन




**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय वार्षिक स्नेहसंमेलन निमित्ताने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता विविध उपक्रम राबविण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून आज आनंदनगरीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महाविद्यालयात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. शिस्तबद्धता आणि आनंदी वातावरणात उपक्रम सर्वांना प्रेरणा देणारा ठरला. विद्यार्थ्यांना स्वावलंबी आणि व्यावहारिक जीवनाचा अनुभव मिळावा म्हणून आनंदनगरीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध गट करून विविध खाद्यपदार्थ आणि विविध खेळाचे स्टॉल लावले होते. आरोग्यास कोणत्याही प्रकारे हानी न पोहोचवणारे पदार्थ यावेळी विद्यार्थ्यांनी स्वतः बनविले होते. अगदी कमी वेळातच हे खाद्यपदार्थ ग्राहकांनी संपविले.विद्यार्थ्यांना महाविद्यालयीनजीवनासोबत व्यावहारिक जीवनामध्ये कसे वागावे ? नफा तोटा या संकल्पना प्रत्यक्ष उदाहरणाच्या माध्यमातून समजावून सांगणे तसेच एक चांगला व्यावसायिक होण्यासाठी काय करावे लागते ? या सर्व गोष्टींचा अनुभव देणे हा मानस देऊन महाविद्यालयाने हा उपक्रम राबविला.यावेळी डॉ. कविता प्राशर, डॉ. भूषण नाफडे, डॉ. क्षमा अनभुले, डॉ. स्वाती पुरी, प्रा.कांचन कायंदे, प्रा. वर्षा वानखेडे, डॉ. वैशाली शिंदे, प्रा.राहुल वाकडे, डॉ. प्रेरणा रामटेके, प्रा. वैष्णवी कुलकर्णी, प्रा. अंजली साळवे यांनी उपक्रम यशस्वीरीत्या राबविला. परीक्षक म्हणून डॉ. प्रवीण कोकणे, डॉ. प्रियदर्शन भवरे, डॉ. रवींद्र भोरे यांनी काम पाहिले.

## राष्ट्रीय सेवा योजनेतून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते - प्रा. डॉ. गणेश रोकडे




**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** राष्ट्रीय सेवा योजनेतून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. यामधून युवकांचा सर्वांगीण विकास होतो असे प्रतिपादन मांडवा येथे जेईएस महाविद्यालय जालना च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या दुसऱ्या दिवशी बौद्धिक सत्रात केले.राष्ट्रीय सेवा योजनेतून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास या विषयावर दुसऱ्या दिवशी बौद्धिक क्षेत्रात प्रा.डॉ गणेश रोकडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षपदी प्राध्यापिका भाग्यश्री बियाणी ह्या होत्या. व्यासपीठावर प्रा दीपा मुंदडा, प्रा. शिल्पा तापडिया आधीची उपस्थिती होती. जेईएस महाविद्यालय जालना येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मांडवा (ता.बदनापूर,जि. जालना) येथे दिनांक 29 जानेवारी ते 4 फेब्रुवारी 2026 दरम्यान विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . यावेळी दुसऱ्या दिवशी बौद्धिक क्षेत्रात राष्ट्रीय सेवा योजनेतून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर गणेश रोकडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजनेतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते पुढे हेच विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये नावलौकिक कमवतात राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांसाठी वरदान असल्याचेही डॉ. रोकडे यांनी सांगितले.अध्यक्षीय समारोप करताना प्राध्यापिका बियाणी म्हणाल्या की राष्ट्रीय सेवा योजनेत महाविद्यालयातील प्रत्येक विद्या विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा यामुळे आपली उन्नतीच होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे, कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. राजेश सरकटे, प्रा योगेश लाहमाटे, प्रा.किशोर तापडिया,प्रा तारो, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. संस्कृती संगम, तर उपस्थितांचे आभार कु. ऋतुजा बनसोडे व्यक्त केलेत. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होत्या.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०१ फेब्रुवारी २०२६


## चिंतामुक्त राहावे

सदा द्यावे तरुणांनी,
अभ्यासाकडे लक्ष.
नेहमीच रहावे तुम्ही,
तयारी करून दक्ष. 1

संकटकाळात सदैव,
चिंतामुक्त राहावे.
आलेल्या संकटात,
संधी शोधून पाहावे. 2

संकटांशी लढतांना,
सर्वस्व पणाला लावावे.
संकटांच्या मागे मागे,
निर्भीडपणे धावावे. 3

एकामागून एक असे,
संकटे येत असतात.
संघर्ष करता त्वेषाने,
संकटे टिकत नसतात. 4

यश मिळविण्यासाठी,
तयारी करावी पक्की.
लढा देता निखराने,
संकटे हारतील नक्की. 5

सदा सर्वदा करावे,
जिंकण्यासाठी कर्म.
विद्यार्थ्यांनो सोडू नये,
तुम्ही लढण्याचा धर्म. 6



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


**प्रवेश सुरू**

**डी.एम.एल.टी.**

**P.G.DMLT**

**फिजोओथेरिपी**

**डिप्लोमा ऑप्थोमेट्री**

**OT टेक्नीशियन**

**X-Ray, ECG**

**रेडीओलॉजी**

**संपर्क**

**9405109103**


# सत्यशोधक विद्यालयात दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**सिल्लोड :** मानव विकास व पूर्णनिर्माण संशोधन संस्था संचलित सत्यशोधक विद्यालय गोषेगाव ता.भोकरदन, जि. जालना येथे सन २०२५-२६ वर्षे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष तथा प्राचार्य श्री. सुनील वाकेकर तसेच प्रमुख पाहुण्या सचिव श्रीमती जयश्रीताई बनकर यांची उपस्थिती लाभली. याप्रसंगी ऋतुजा जाधव, वैष्णवी जाधव, गंगासागर खरात , प्रतिभा गव्हाळे, पल्लवी घोडे , पूनम मोहिते अनेक विद्यार्थ्यांनि शाळेतील गोड प्रसंग त्यांच्या मनोगतातून मांडले. मनोगत व्यक्त करतांना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर शाळेतून दूर जाण्याचे दुःख उमटून आले. अध्यक्ष श्री.वाकेकर यांनी अध्यक्ष भाषणात विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी तसेच १०, १२ वी च्या परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गीता खरात हिच्या काव्य स्पंदन या काव्यसंग्रहात कविता प्रकाशित झाल्याबद्दल तिचा मेडल देऊन सत्कार करण्यात आला. स्नेहा खोडके व दीप्ती मोहिते यांनी वर्षभरातील मूल्यमापणानुसार त्यांना पर्यवेक्षक इफरोज पठाण यांच्या संकल्पनेतून बक्षीस देण्यात आले. १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांनी शाळेसाठी ढोल, घड्याळ, महापुरुषाच्या प्रतिमा भेट दिल्या. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती लाभली कार्यक्रम आयोजित करण्यासाठी इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी व वर्गशिक्षक श्री शिंदे जी जी व श्री जाधव डी एस यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन स्नेहा खोडके तर आभार वैष्णवी अन्नपूर्णे हिने केले.

# गिरी सरांचा विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाचा वाटा - शरण पाटील




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** शैक्षणिक क्षेत्रात निष्ठेने कार्य करून प्रदीर्घ सेवेनंतर ते आज सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचा हा प्रवास प्रेरणादायी राहिला. केवळ कुटुंबच नव्हे तर महाविद्यालयात देखील त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काम केले. विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून गिरी सरांचा विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाचा वाटा राहिल्याचे प्रतिपादन युवा नेते शरण पाटील यांनी केले. मुरूम येथील प्रतिभा निकेतन कनिष्ठ महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. या कनिष्ठ महाविद्यालयातील जीवशास्त्र विषयाचे प्रा. संजय गिरी यांचा शनिवारी (ता. 31) रोजी नगर शिक्षण विकास मंडळाकडून सेवापुर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य उल्हास घुरघुरे होते. प्रा. संजय गिरी व सौ. विजया गिरी सपत्नीक, वडील प्रेमगीर गिरी, आई अनुसया गिरी यांचा सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी नगर शिक्षण विकास मंडळाचे संचालक प्रा. डॉ. सतिश शेळके, माजी प्राचार्य सच्चिदानंद अंबर, काशिनाथ मिरगाळे, रामलिंग बिराजदार, राजू मुल्ला आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी कै. माधवराव पाटील यांच्या प्रतिमेस शरण पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कै. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली व्यक्त करून महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रा. अशोक बावगे, ज्ञानेश्वरी सुरवसे, भाग्यश्री उडचणे आदींनी मनोगत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना गिरी म्हणाले की, शैक्षणिक क्षेत्रात काम करताना आलेले अनुभव कथन करून संपूर्ण जीवनाचा लेखाजोखा मांडून सर्वांप्रती कृतज्ञताभाव व्यक्त करून उपस्थितांचे आभार मानले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी उल्हास घुरघुरे म्हणाले की, गिरी सरांनी आई-वडिलांच्या संस्काराची शिदोरी घेऊन शिक्षण क्षेत्रात प्रदीर्घ सेवा करत असताना विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा ध्यास त्यांनी घेतला. प्रा. उमाकांत महामुनी यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा. सतिश रामपुरे तर आभार प्रा. साक्षी महामुनी यांनी मानले. प्राध्यापक, मुख्याध्यापक, सहशिक्षक, मित्र परिवार, नातेवाईक आदींनी त्यांचा यथोचित सत्कार केला. फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील संस्थेच्या वतीने संजय गिरी, विजया गिरी यांचा सत्कार करताना शरण पाटील, सतिश शेळके, उल्हास घुरघुरे व अन्य.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०१ फेब्रुवारी २०२६

# कन्नड शहरात सेवा भारतीचे रुग्ण सेवा केंद्र सुरू



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड शहरात प्रजासत्ताक दिनाच्या शुभ मुहुर्तावर सेवा भारती देवगिरी प्रांताच्या वतीने ३८ वे रुग्ण सेवा केंद्र सुरू करण्यात आहे. या सेवा केंद्रांचे उदघाटन साने गुरुजी विद्यालयाचे अध्यक्ष तथा रोटरी क्लब शाखा कन्नड चे अध्यक्ष डॉ. मिलींद पाटील व सिल्लोड जिल्हा संघचालक शेखर मांडे, देवगिरी प्रांत सेवा भारतीचे अध्यक्ष डॉ. सुर्यकांतजी शिरपेवार यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या प्रसंगी डॉ. मिलींद पाटील यांनी कन्नड शहरात अशा रुग्ण सेवा केंद्राची आवश्यकता आहे. त्यातून गरजूंनी या सेवा केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुर्यकांत शिरपेवार यांनी देवगिरी प्रांत सेवा भारतीच्या विविध उपक्रमाची माहिती विस्तृत स्वरूपात सांगीतली. आपले जीवन फक्त स्वत:साठी किंवा कुटुंबासाठी नसून समस्त मानव जाती साठी आहे. हे न विसरण्याचे आवाहन त्यांनी उपस्थित तरुणांना केले. या प्रसंगी सेवा भारती देवगिरी रूग्णोपयोगी साहित्य केंद्र प्रकल्प प्रमुख शिरीषजी काळे, कार्यालयीन सचिव श्रीधरजी प्रयाग, विजय वाणी, राजू शर्मा, हरिश महाले, मनोज शर्मा, भाग्यलक्ष्मी शर्मा, कन्नड रुग्ण सेवा केंद्राचे प्रमुख शशिन जाधव, केंद्र सहप्रमुख मयुर राठोड, प्रमोद ढोले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रमोद ढोले यांनी केलेतर आभार प्रदर्शन मयुर राठोड यांनी केले.

निमुलायझर, ऑक्सीजन कॉन्सट्रेटर, हॉस्पीटल बेड, व्हीलचेअर, वॉकर, एअर बेड, वाटर बेड,सलाईन स्टॅण्ड, कमोड चेअर इत्यादी साहित्य अल्प दरात सेवा केंद्र सुरू करण्यात आले आहे. गरजूंनी जरूर लाभ घ्यावा. शशिन जाधव ( केंद्र प्रमुख) मयुर राठोड (केंद्र सहप्रमुख) यांनी केले आहे.

# उद्योजक होण्यासाठी कौशल्य विकास आवश्यक - प्रा. डॉ. मनोजकुमार नवसे



**पाटोदा (प्रतिनिधी) :** उद्योजक होण्यासाठी युवकामध्ये कौशल्य विकासाची आवश्यकता आहे! असे प्रतिपादन प्रा. डॉ. मनोजकुमार नवसे यांनी केले ते पाटोदा येथिल जयभवानी महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर, विद्यार्थी विकास विभाग आणि कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा, लोकप्रशासन विभाग , यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उद्योजकता विकास कार्यशाळेत " कौशल्य विकास "या विषयावर बंकट स्वामी महाविद्यालय बीड येथील इंग्रजी विभाग प्रमुख डॉक्टर मनोज कुमार नवसे यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत प्रमुख वक्त्यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक काळातील उद्योजकतेसाठी आवश्यक असलेल्या विविध कौशल्यांबाबत सविस्तर माहिती दिली. वक्त्यांनी आपल्या भाषणात संवाद कौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता, निर्णयक्षमता, नेतृत्वगुण तसेच तांत्रिक कौशल्ये यांचे महत्त्व अधोरेखित केले. केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून प्रत्यक्ष अनुभव, नाविन्यपूर्ण विचार आणि सातत्यपूर्ण कौशल्य विकास यांमुळेच यशस्वी उद्योजक घडतो, असे त्यांनी सांगितले.आजच्या स्पर्धात्मक युगात स्वयंरोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध असून तरुणांनी त्या ओळखून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले. सदरील कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकते संदर्भात सकारात्मक व प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले .या सत्राचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. शिवाजी काकडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ.कल्पना हनुमंत घारगे यांनी केले.

# अजितदादांसमोर स्वर्गीय लिहू नका - रोहित पवार



**मुंबई** :राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामती येथे झालेल्या विमान दुर्घटनेतील निधनानंतर संपूर्ण राज्य शोकसागरात बुडाले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसने महत्त्वाचा निर्णय घेत सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड केली असून त्या आज उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेत आहेत. या वेगवान राजकीय घडामोडींमध्येच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांची एक भावनिक सोशल मीडिया पोस्ट चर्चेचा विषय ठरली आहे. बारामतीतील श्रद्धांजलीच्या बॅनरांनी त्यांच्या मनाला चटका लावल्याचे या पोस्टमधून स्पष्ट दिसते.
रोहित पवार यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर एक मन हेलावून टाकणारा संदेश शेअर केला आहे. या संदेशातून त्यांनी बारामतीतील कार्यकर्त्यांना आणि अजित पवारांवर प्रेम करणाऱ्या सर्वांना एक कळकळीची विनंती केली आहे. अजित पवार यांच्या नावापुढे 'स्वर्गीय' असा उल्लेख करू नये, असे त्यांनी हात जोडून आवाहन केले आहे. त्यांच्या या विनंतीमागे केवळ भावना नाहीत, तर अजितदादांबद्दल असलेला जिव्हाळा आणि आत्मीयता दिसून येते.

आपल्या पोस्टमध्ये रोहित पवार यांनी बारामतीच्या राजकीय संस्कृतीचा उल्लेख करत लिहिले आहे की, बारामतीचं दुसरं नाव म्हणजे आदरणीय साहेब आणि मा. अजितदादा. आतापर्यंत जेव्हा जेव्हा या दोघांपैकी कोणाला सत्तेचं पद मिळायचं, तेव्हा बारामतीत मोठमोठे अभिनंदनाचे बॅनर झळकायचे. त्या बॅनरांवर 'उपमुख्यमंत्रीपदी निवड' किंवा 'भावी मुख्यमंत्री' अशा ठळक अक्षरांत अजितदादांचा देखणा आणि राजबिंडा फोटो असायचा. ते दृश्य पाहून मन आनंदाने भरून यायचे आणि अभिमान वाटायचा, असे त्यांनी नमूद केले.
मात्र आज चित्र पूर्णपणे बदलले आहे, असे रोहित पवार यांनी म्हटले आहे. अभिनंदनाच्या बॅनरांच्या जागी आता श्रद्धांजलीचे फलक दिसत आहेत. गळ्यात हार घातलेला अजितदादांचा फोटो पाहणे डोळ्यांना सहन होत नाही, असे त्यांनी व्यक्त केले. डोंगराएवढ्या दु:खापुढे आज ना पदाचं कौतुक उरलं आहे, ना आनंदाचा जल्लोष, असे म्हणत त्यांनी आपली वेदना शब्दांत मांडली आहे. या ओळींमधून त्यांच्या मनातील वेदना स्पष्ट जाणवते.

रोहित पवार पुढे म्हणतात की, हे बॅनर लावणारे सर्वजण अजितदादांवर प्रचंड प्रेम करणारे आहेत, याची त्यांना जाणीव आहे. तरीही त्यांनी विनंती केली आहे की, मा. अजितदादा आपल्यातच होते, आपल्यातच आहेत आणि त्यांच्या कामातून ते कायम आपल्यातच राहतील. त्यामुळे त्यांच्या नावापुढे 'स्वर्गीय' हा शब्द लावण्याची धाडस स्वत:मध्ये नाही, तसेच इतरांनीही तो शब्द वापरू नये, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, सुनेत्रा पवार यांच्या उपमुख्यमंत्रीपदाच्या शपथविधीच्या हालचाली सुरू असताना रोहित पवारांची ही पोस्ट भावनिक वातावरण अधिकच गहिरं करणारी ठरली आहे. एका बाजूला राजकीय निर्णयांची घाई, तर दुसऱ्या बाजूला अजित पवारांच्या आठवणींनी व्याकुळ झालेले कार्यकर्ते आणि नेते, असे चित्र सध्या बारामतीसह राज्यात पाहायला मिळत आहे. रोहित पवारांच्या या संदेशाने अनेक कार्यकर्त्यांच्या भावना शब्दांत व्यक्त झाल्याची प्रतिक्रिया उमटत आहे.



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०१ फेब्रुवारी २०२६

# संत रविदास महाराज : सामाजिक न्यायाचा दीपस्तंभ

डॉ. राजेंद्र बगाटेभारतीय समाजाच्या इतिहासात संतपरंपरेला केवळ आध्यात्मिक नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची चळवळ म्हणून विशेष स्थान आहे. मध्ययुगीन भारतातील सामाजिक विषमता, जातिभेद, धार्मिक कर्मकांड आणि मानवी प्रतिष्ठेचे होत असलेले अवमूल्यन या पार्श्वभूमीवर संतांनी मानवतावादी विचार मांडले. याच संतपरंपरेतील एक तेजस्वी आणि सामाजिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा संत म्हणजे संत रविदास महाराज होय. 01 फेब्रुवारी रोजी साजरी होणारी त्यांची जयंती ही केवळ एका संताचे स्मरण करण्यापुरती मर्यादित न राहता, भारतीय समाजाच्या समतेच्या संघर्षाचा आणि माणुसकीच्या मूल्यांचा पुनर्विचार करण्याची संधी देते.संत रविदास महाराजांचा काळ हा सामाजिक अन्यायाने ग्रासलेला होता. जातीनुसार माणसाचे मूल्य ठरवले जात होते. जन्माच्या आधारे शुद्ध-अशुद्ध, उच्च-नीच असे भेद केले जात होते. समाजातील मोठा वर्ग शिक्षण, धर्म, संस्कृती आणि सन्मानापासून वंचित होता. अशा काळात संत रविदास महाराजांनी माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, हा मूलभूत विचार निर्भीडपणे मांडला. त्यांच्या विचारांची धार समाजातील अन्यायकारक रचनांवर थेट प्रहार करणारी होती. संत रविदास महाराजांचा जन्म वंचित समाजघटकात झाला असला, तरी त्यांनी आपल्या जन्माला कधीही मर्यादा मानली नाही. उलट, त्यांनी आपल्या अनुभवांमधून समाजातील विषमतेची तीव्र जाणीव करून घेतली आणि त्याविरुद्ध वैचारिक संघर्ष उभारला. त्यांनी सांगितले की माणसाची ओळख त्याच्या जन्माने नव्हे, तर त्याच्या कर्माने आणि आचरणाने ठरते. हा विचार त्या काळातील सामाजिक व्यवस्थेसाठी क्रांतिकारक होता. अस्पृश्यता ही त्या काळातील समाजाची सर्वात विदारक समस्या होती. काही माणसांना केवळ जन्मामुळे अपवित्र ठरवले जात होते. त्यांना सामाजिक जीवनापासून दूर ठेवले जात होते. संत रविदास महाराजांनी या अमानवी व्यवस्थेचा तीव्र निषेध केला. ईश्वर जर सर्वांमध्ये आहे, तर एखादा माणूस अपवित्र कसा ठरू शकतो, हा त्यांनी उपस्थित केलेला प्रश्न आजही तितकाच मूलभूत आहे. त्यांच्या विचारांनी अस्पृश्यतेच्या मुळावरच घाव घातला.संत रविदास महाराजांचा संघर्ष केवळ शब्दांपुरता नव्हता. त्यांच्या दैनंदिन आचरणातून समतेचा विचार प्रकट होत होता. त्यांनी सर्व जाती-धर्मांच्या लोकांशी समानतेने वागणूक दिली. त्यांच्या सहवासात कोणताही भेदभाव नव्हता. त्यामुळे त्यांच्या आश्रमात आणि त्यांच्या सभोवती समतेचे एक वेगळे सामाजिक विश्व उभे राहिले. समाजातील वंचित घटकांना त्यांच्या सहवासातून आत्मसन्मानाची जाणीव मिळाली. धर्मसत्तेवर केलेली टीका हे संत रविदास महाराजांच्या सामाजिक कार्याचे आणखी एक महत्त्वाचे अंग होते. धर्म हा माणसाला माणसाशी जोडणारा असावा, तो माणसामाणसांत भिंती उभ्या करणारा नसावा, असा त्यांचा आग्रह होता. कर्मकांड, बाह्य विधी आणि दांभिक धार्मिक आडंबर यांवर त्यांनी कठोर प्रहार केला. त्यांच्या मते खरा धर्म म्हणजे करुणा, परोपकार आणि सामाजिक न्याय तत्त्व आत्मसात सारणे होय. श्रमप्रतिष्ठेचा विचार संत रविदास महाराजांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा होता. शारीरिक श्रम करणाऱ्या वर्गाला समाजात तुच्छ लेखले जात होते. संत रविदास महाराजांनी श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली. समाज उभा राहतो तो श्रमिकांच्या कष्टावर, हे त्यांनी ठामपणे मांडले. श्रम करणारा माणूस कमी दर्जाचा नसून तो समाजाचा आधारस्तंभ आहे, हा संदेश त्यांनी आपल्या जीवनातून दिला.संत रविदास महाराजांची वाणी आणि साहित्य हे त्यांच्या सामाजिक कार्याचे प्रभावी साधन होते. त्यांच्या पदांमध्ये आणि उक्तींमध्ये समाजातील अन्यायावर थेट भाष्य आढळते. त्यांची भाषा सरळ, अनुभवसिद्ध आणि सामान्य माणसाच्या मनाला भिडणारी होती. त्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रसार व्यापक स्तरावर झाला. भक्ती ही केवळ वैयक्तिक मोक्षाची प्रक्रिया नसून ती सामाजिक आचरणाशी जोडलेली आहे, हा विचार त्यांनी सातत्याने मांडला. त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू माणूस आहे. जो माणूस दुसऱ्याशी प्रेमाने आणि न्यायाने वागतो, तोच खरा भक्त आहे, असे त्यांनी सांगितले. जात, धर्म, लिंग किंवा भाषा यांवर आधारित कोणताही भेद त्यांनी नाकारला. माणसाचे मोल त्याच्या आचरणावर ठरते, हा विचार सामाजिक समतेचा पाया आहे. स्त्री-पुरुष समानतेविषयीचा दृष्टिकोनही त्यांच्या विचारांमध्ये दिसून येतो. त्या काळातील मर्यादा असूनही त्यांनी स्त्रीला दुय्यम स्थान दिले नाही. मानवी मूल्यांच्या पातळीवर स्त्री-पुरुष समान आहेत, हा त्यांचा दृष्टिकोन सामाजिकदृष्ट्या प्रगत होता.संत रविदास महाराजांनी कल्पिलेला समाज हा समतेवर, न्यायावर आणि बंधुत्वावर आधारित होता. अशा समाजात कोणालाही जन्मामुळे कमी लेखले जात नाही. ही संकल्पना केवळ स्वप्नवत नव्हती, तर सामाजिक परिवर्तनाची दिशा दाखवणारी होती. त्यामुळे त्यांच्या विचारांनी समाजातील वंचित घटकांना परिवर्तनाची आशा दिली. आधुनिक भारतात संत रविदास महाराजांचे विचार अधिकच सुसंगत ठरतात. आजही जातीय विषमता, सामाजिक बहिष्कार आणि आर्थिक असमानता विविध स्वरूपांत अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत त्यांचा समतेचा संदेश मार्गदर्शक ठरतो. भारतीय संविधानाने दिलेली समानता, सामाजिक न्याय आणि बंधुतेची मूल्ये संत रविदास महाराजांच्या विचारांशी सुसंगत आहेत. संविधानिक मूल्यांची प्रभावी अंमलबजावणी तेव्हाच शक्य होते, जेव्हा समाजमन त्यासाठी तयार असते. संत रविदास महाराजांचे विचार समाजमन घडवण्याचे कार्य करतात. त्यामुळे ते केवळ धार्मिक संत न राहता सामाजिक परिवर्तनाचे प्रेरणास्थान ठरतात. आज संत रविदास महाराजांची जयंती साजरी करताना त्यांच्या विचारांचे आचरणात रूपांतर करणे, हीच त्यांना खरी मानवंदना ठरेल. सामाजिक समतेसाठी झटणे, श्रमाचा सन्मान करणे आणि माणुसकी जपणे, हाच त्यांच्या संदेशाचा गाभा आहे. 01 फेब्रुवारी रोजी त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या मानवतावादी विचारांचे स्मरण करणे, हेच या दिनाचे खरे औचित्य आहे.समाजाच्या इतिहासात असे काही विचारवंत जन्माला येतात, जे केवळ आपल्या काळाचे प्रतिनिधित्व करत नाहीत, तर येणाऱ्या पिढ्यांसाठीही मूल्यदिशा ठरवतात. संत रविदास महाराज हे त्याच प्रकारचे द्रष्टे संत होते. त्यांनी मांडलेला समतेचा विचार हा तत्कालीन समाजव्यवस्थेवर टीका करणारा तर होताच, पण तो भविष्यातील समाजरचनेसाठीही मार्गदर्शक ठरला. त्यांच्या विचारांचा गाभा हा माणसाच्या प्रतिष्ठेभोवती फिरतो. कोणताही माणूस जन्मामुळे कमी किंवा अधिक ठरू शकत नाही, ही भूमिका त्यांनी अत्यंत ठामपणे मांडली.संत रविदास महाराजांच्या विचारांचा प्रभाव केवळ धार्मिक क्षेत्रापुरता मर्यादित राहिला नाही. सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक क्षेत्रांतही त्यांच्या विचारांनी खोलवर परिणाम घडवून आणला. समाजातील वंचित घटकांना त्यांनी आत्मभान दिले. अन्याय सहन करणे ही नियती नसून त्याविरुद्ध विचारपूर्वक उभे राहणे हेच खरे माणूसपण आहे, हा संदेश त्यांच्या संपूर्ण जीवनातून प्रकट होतो. त्यामुळे त्यांच्या विचारांची धार ही परिवर्तनवादी होती. भक्ती चळवळीतील इतर संतांप्रमाणेच संत रविदास महाराजांनीही भक्तीला सामाजिक आशय दिला. भक्ती म्हणजे केवळ ईश्वराचे नामस्मरण नव्हे, तर समाजातील अन्याय ओळखून त्याविरुद्ध नैतिक भूमिका घेणे, असा त्यांचा आग्रह होता. त्यामुळे त्यांच्या भक्तीत विद्रोहाची सौम्य, पण प्रभावी छटा आढळते. ही भक्ती समाजाला अंतर्मुख करते आणि आत्मपरीक्षणास भाग पाडते. आजच्या जागतिकीकरणाच्या, तंत्रज्ञानप्रधान आणि स्पर्धात्मक युगातही संत रविदास महाराजांचे विचार तितकेच लागू पडतात. आर्थिक प्रगती झाली असली, तरी सामाजिक विषमता पूर्णपणे नष्ट झालेली नाही. जात, वर्ग, लिंग आणि आर्थिक स्थिती यांवर आधारित भेद अजूनही दिसून येतात. अशा वेळी संत रविदास महाराजांचा मानवतावादी दृष्टिकोन समाजाला अधिक समतावादी आणि संवेदनशील बनवू शकतो. शिक्षणाच्या माध्यमातून संत रविदास महाराजांच्या विचारांचा प्रसार होणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण हे केवळ रोजगाराचे साधन नसून सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे प्रभावी माध्यम आहे. त्यांच्या विचारांमधील समता, श्रमप्रतिष्ठा आणि बंधुता ही मूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचली, तर समाज अधिक न्याय्य होऊ शकतो. त्यामुळे त्यांच्या विचारांचा अभ्यास हा केवळ ऐतिहासिक गरज नसून सामाजिक गरज आहे.संत रविदास महाराजांचा वारसा हा केवळ ग्रंथांमध्ये किंवा जयंतीपुरता मर्यादित राहू नये. तो प्रत्यक्ष आचरणात उतरला पाहिजे. सामाजिक समतेसाठी केलेला प्रत्येक प्रयत्न, श्रमाचा सन्मान करणारी प्रत्येक कृती आणि माणुसकी जपणारे प्रत्येक पाऊल हेच त्यांच्या विचारांचे खरे स्मरण ठरेल. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचवण्याची जिद्द म्हणजेच संत रविदास महाराजांच्या विचारांना जिवंत ठेवण्याचा मार्ग आहे.अशा प्रकारे संत रविदास महाराजांचे सामाजिक कार्य, तत्त्वज्ञान आणि मानवतावादी दृष्टिकोन हे भारतीय समाजाच्या परिवर्तनाच्या प्रवासातील महत्त्वाचे अधिष्ठान ठरते. 01 फेब्रुवारी रोजी त्यांची जयंती साजरी करताना त्यांच्या विचारांचे स्मरण करणे ही केवळ औपचारिक बाब नसून ती सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देणारी घटना आहे. समता, श्रम आणि माणुसकी यांचा संदेश देणारे संत रविदास महाराज आजही आपल्या समाजाला अंतर्मुख होण्यास आणि अधिक मानवी बनण्यास प्रवृत्त करतात.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra५@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002